**महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघ यांना एफएक्यू दर्जाचा कापूस खरेदी करण्यासाठी वित्तीय संस्था यांचे कडून मिळणा-या कर्जास हमी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः- सपवव-२००८/प्र.क्र.४४/अर्थबळ,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २६ डिसेंबर, २००८.

**वाचा :**
१. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. शासन हमी-१०९९/ प्र.क्र.६८/शासन हमी, दिनांक ५ नोव्हेंबर,१९९९.
२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.सपवव-२००८/प्र.क्र.४४/अर्थबळ, दिनांक १५ डिसेंबर, २००८.

**शासन निर्णय :**

कापूस हंगाम २००८-०९ करिता नाफेडशी झालेल्या करारानुसार नाफेडच्या वतीने कापसाची खरेदी करण्याकरिता महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक व पणन महासंघाला महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून एकुण रु.४०० कोटी (अक्षरी रु.चारशें कोटी फक्त) इतके नजर गहाण कर्ज घेण्यासाठी संदर्भाधीन २ मधील शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान केलेली आहे. आता. महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक व पणन महासंघ, मुंबई व्दारे करण्यात येत असलेली कापूस खरेदी विचारात घेवून, यापूर्वी दि.१५.१२.२००८ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या रु.४०० कोटी इतक्या शासन हमी व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक व पणन महासंघाला महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून आणखी रुपये ६०० कोटी (रुपये सहाशे कोटी फक्त) इतके नजरगहाण कर्ज घेण्यासाठी शासन हमी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. सदर शासन हमी रुपये ६०० कोटीची मुदत दिनांक ३१ मार्च,२००९ पर्यंत वैध राहील.

३. सदर शासन हमी करिता उपरोक्त शासन निर्णय, वित्त विभाग दि. १५/१२/२००८ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

४. केवळ FAQ दर्जाच्या कापूस खरेदीसाठी ही हमी असून नाफेडकडून कापूस विक्रीची रक्कम सत्वर मिळविणे व ती सर्क्युलेशनने वापरणे यावर सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने लक्ष केंद्रित करावे.

५. विभागाने नाफेडला पुरविलेल्या कापसाच्या गाठीच्या किंमत वसुलीचा साप्ताहिक अहवाल, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघ यांच्या कडून प्राप्त करुन वित्त विभागास पाठवावा.

६. हा शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग यांच्या नस्ती क्र. कापूस १००८ /प्र.क्र.१३१/१०-स, वरील प्रस्ताव व वित्त विभागाचा शासन हमी क्रमांक :०४/२००८-२००९, नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई समवेत कर्ज घेण्यासंबंधी करावयाच्या करारपत्रावर स्वाक्षरी करण्याकरिता सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागातील संबंधीत उप सचिव व वित्त विभागातील उप सचिव (शासन हमी) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.Maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(स. मा. साबळे)**
अवर सचिव, वित्त विभाग.

**प्रति,**
प्रधान सचिव. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग. मंत्रालय, मुंबई.
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**कृ.मा.प.**

C:\Documents and Settings\shas1904\Desktop\Govt. Gurantee\Arthbalkupus panan maha.lwp

पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
जॉईन्ट चीफ ऑफिसर, अॅग्रीकल्चरल क्रेडीट डिपार्टमेंट, सेंट्रल ऑफिस, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मार्केट हाऊस, पोस्ट बॉक्स नं. १८७७५, वरळी , मुंबई ४०० ०१८.
सहाय्यक सरव्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया, मांडवी शाखा, २८१/२८७, नरसी नाथा स्ट्रीट,कनमून हाऊस, मसजीद बंदर, मुंबई ४०० ००९
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक , फोर्ट, मुंबई
वित्त विभाग (शासन हमी / व्यय-२/अर्थोपाय/सा.उ.), मंत्रालय, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ, मर्या. मुंबई
कार्यासन १-स /१६-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग. मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती/अर्थबळ.